बँकेच्या सातत्यपूर्ण यशामागे आहे

# आपणा सर्वांचा अढळ विश्वास

स्वनिधी
₹
१२२१९.७२
लाख

ठेवी
₹
१३३०२०.५८
लाख

कर्जे
₹
९४१०६.३५
लाख

एकूण
व्यवसाय
₹
२२७१२६.९३
लाख




५६ वा वार्षिक अहवाल
सन २०१६-१७

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

ऑडिट वर्ग 'अ'

# श्री छत्रपती शिवाजी महाराज



**नसे गर्व आंगी सदा वीतरागी । क्षमा शांती भोगी दयादक्ष योगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । इंही लक्षणी जाणिये योगिराणा ।।**



# प्रेरणास्थान

## मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार

अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



कणखर नेतृत्व व कुशल मार्गदर्शक

**मा. आ. श्री. अजितदादा पवार**

माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

बारामतीचे भूषण

**मा. खा. सौ. सुप्रिया सुळे**



# दि बारामती सहकारी बँक लि.

## संचालक मंडळ

(सन २०१५ ते २०२०)



श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष



श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष



श्री. रमणिक रामजी मोता



श्री. सचिन सदाशिव सातव



ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी



श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के



श्री. दिग्विजय पोपटराव तुपे



श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर



श्री. आदेश अनिलकुमार वडुजकर



श्री. उध्दव सोपानराव गावडे



श्री. सुरेश गुलाबराव देवकाते



श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे



श्री. कपिल राजेंद्र बोरावके



डॉ. वंदना उमेश पोतेकर



सौ. कल्पना प्रदिप शिंदे



श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)



ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक



श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

---

## * काष्टी शाखा उद्घाटन समारंभ *

दि. १४ एप्रिल २०१६ रोजी मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते व
मा.आ.श्री. राहुलदादा जगताप पाटील,
अध्यक्ष, कुकडी सह. साखर कारखाना यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला






# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांसाठी)

## विशेष सूचना

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक ०३ सप्टेंबर २०१७ रोजी दुपारी ३.४५ वाजता** राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती या ठिकाणी बोलविण्यांत आली आहे. सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यांत येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## * सभेपुढील विषय *

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २० ऑगस्ट २०१६ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
३. सन २०१६–२०१७ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांष जाहीर करणे.
४. मा. सरकारी लेखापरिक्षक यांनी तपासणी केलेल्या सन २०१६–२०१७ सालच्या आर्थिक हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे. तसेच सन २०१५–१६ च्या सरकारी लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
५. सन २०१७–२०१८ या वर्षासाठी बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. सन २०१७–१८ या आर्थिक वर्षासाठी सरकारी लेखापरिक्षक व स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे चालू आर्थिक वर्षात असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८. सन २०१७–२०१८ या आगामी आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.
९. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०. बँकेच्या शाखांकरिता जागा खरेदी करण्यासाठी इमारत निधीचा विनियोग करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
११. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१२. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयांचा विचार करणे.

**दिनांक : १६ ऑगस्ट २०१७**

**स्थळ : बारामती**

**मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेनुसार**

**श्री. गो. बहुळकर**
**कार्यकारी संचालक**

## * विशेष सूचना *

१. ही सभा कोरम अभावी तहकूब करावी लागल्यास सभा अर्धा तास तहकूब केली जाईल व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा घेतली जाईल. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.
२. सभासदांना वर नमूद विषया संबंधी काही विचारावयाचे असल्यास तसे त्यांनी दि. ३०.०८.२०१७ अखेर पर्यंत बँकेत लेखी कळवावे. त्यांनतर आलेल्या पत्रांच्या विषयाचे अथवा शंकांचे निरसन करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.
३. सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांषाची रक्कम बँक सभासदांच्या बँकेतील सेव्हिंग्ज्/चालु किंवा अन्य खात्यात जमा देत असते. ज्या सभासदांचे खाते बँकेत नसेल त्यांनी त्वरित खाते उघडून या सेवेचा लाभ घ्यावा.
४. ९७ व्या घटनादुरूस्तीनंतर सभासदांची वर्गवारी क्रियाशिल सभासद व निष्क्रीय सभासद अशी करण्यांत येत आहे. यापुढे क्रियाशिल सभासदांनाच संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. क्रियाशिल सभासदांसाठी पुढील अटी आहेत.
   १. बँकेच्या पोटनियम क्र. १४ व १५ नुसार सभासदाने कमीतकमी ₹ १५००/– चे भाग धारण करणे आवश्यक आहे. तसेच पाच वर्षात एकातरी वार्षिक सभेस उपस्थित रहावयाचे आहे.
   २. सभासदाची बँकेत रूपये सात हजाराची ठेव असावी किंवा त्यांचा रूपये एक लाखाचा कर्जव्यवहार असणे आवश्यक आहे.
   तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी व ज्या सभासदांनी हे निकष पुर्ण केले नसतील, तर त्यांनी ते पुर्ण करावेत.

# शाखा विस्तार

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| ०१ | मुख्यालय (स्वमालकीची वास्तु) | (०२११२)२२४८६५, २२४८४४/९९२२४४४१५० |
| ०२ | बारामती शाखा | (०२११२)२२४८६६, २२७७०४/९९२२४४४१५१ |
| ०३ | इंदापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१११)२२३२७७, २२४७६६/९९२२४४४१५३ |
| ०४ | भिगवण शाखा | (०२११८)२४६२०५ /९९२२४४४१५४ |
| ०५ | दौंड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११७) २६४४७७,२६४९५९ /९९२२४४४१५५ |
| ०६ | चिंचवड शाखा | (०२०) २७४५०११०, ७३५४८२६/९९२२४४४१५६ |
| ०७ | कोथरूड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २५३९५२०० /९९२२४४४१५७ |
| ०८ | मार्केट यार्ड शाखा | (०२०) २४३६०९६६ /९९२२४४४१५८ |
| ०९ | निरा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११५) २४२४७७ /९९२२४४४१५९ |
| १० | फलटण शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६६) २२२७७७ /९९२२४४४१६१ |
| ११ | करमाळा शाखा | (०२१८२) २२०९७७ /९९२२४४४१६० |
| १२ | बार्शी शाखा | (०२१८४) २२२०८९ /९९२२४४४१६२ |
| १३ | पुणे - नगर रोड शाखा | (०२०) २७०११९४२, २७०११९३७ /९९२२४४४१६३ |
| १४ | लक्ष्मी रोड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २४४५५११७ /९९२२४४४१६४ |
| १५ | हडपसर शाखा | (०२०) २६९८१८६६ /८३८०००४२९२ |
| १६ | सातारा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६२) २३७९४०, २३७९५५ /९९२२४४४१६५ |
| १७ | सोलापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१७) २७२९२६६, २७२९२७७ /९९२२४४४१६६ |
| १८ | जळोची शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ /९८५०८९४५४९ |

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| १९ | संगमनेर शाखा | (०२४२५) २२७६६६, २२२७०१ /८३८०००४२९४ |
| २० | चाकण शाखा | (०२१३५) २४९११२ /८३८०००४२९५ |
| २१ | शिरूर शाखा | (०२१३८) २२२२६६ /८३८०००४२९७ |
| २२ | अहमदनगर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२४१) २३२७७०१ /८३८०००४२९६ |
| २३ | नवी सांगवी शाखा | (०२०) २७२०३०८८ /९९२२९११४०४ |
| २४ | भोसरी शाखा | (०२०) २७११००१६ /९९२२४४४२०८ |
| २५ | सिंहगड रोड शाखा | (०२०) २४३५५१५५ |
| २६ | काष्टी शाखा | (०२४८७) २३११७७ /९९२२४४४१७७ |
| २७ | शिरवळ शाखा | (०२१६९)२४५२४४ /९९२२४४४१८८ |
| २८ | तळेगांव शाखा | (०२११४)२२२८४४ |
| २९ | हिंजवडी शाखा | (०२०)२२९३४६४६ |
| ३० | टेंभुर्णी | (०२१८३)२३१९७७ |
| ३१ | सिन्नर | (०२५५१)२२२६६६ |
| ३२ | श्रीरामपूर | (०२४२२)२२५५६६ |
| ३३ | मोहोळ | (०२१८९)२३३८७७ |
| ३४ | पनवेल | (०२२)२७४५५०४६ |
| ३५ | माळेगांव | (०२११२)२५४११२ |
| ३६ | कोंढवा | ७८८७८८०१६५ |
| ३७ | वाई | (०२१६७) २२२७७७/ ७८८७८८०१६३ |
| ३८ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष) | (०२११२) २४४२५४ /९०२८७७७२४३ |

# ✻ संचालक मंडळ ✻

**श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची**
अध्यक्ष

**श्री. अविनाश रमेश लगड**
उपाध्यक्ष

**श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर**
कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| **श्री. रमणिक रामजी मोता** | **श्री. सचिन सदाशिव सातव** | **ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी** |
| **श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के** | **श्री. दिग्विजय पोपटराव तुपे** | **श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर** |
| **श्री. आदेश अनिलकुमार वडुजकर** | **श्री. उध्दव सोपानराव गावडे** | **श्री. सुरेश गुलाबराव देवकाते** |
| **श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे** | **श्री. कपिल राजेंद्र बोरावके** | **डॉ. वंदना उमेश पोतेकर** |
| **सौ. कल्पना प्रदिप शिंदे** | **श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे**<br>तज्ञ संचालक (सी.ए.) | **ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे**<br>तज्ञ संचालक |

**बँकर्स**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

दि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बारामती

एच.डी.एफ.सी. बँक, पुणे

## दि. ३१ मार्च २०१७ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा या बाबतची माहिती

(₹ कोटीत)

| अनु. | शाखेचे नांव | ठेवी | कर्ज | नफा /तोटा |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारामती शाखा | २७१.५६ | १६४.२३ | १.४३ |
| ०२ | इंदापूर शाखा | १०६.४४ | ८२.३८ | ०.५६ |
| ०३ | भिगवण शाखा | ४४.४८ | १९.९० | ०.२१ |
| ०४ | दौंड शाखा | ४७.३२ | ४६.६३ | ०.५० |
| ०५ | चिंचवड शाखा | ९१.९२ | ६३.५५ | ०.५२ |
| ०६ | कोथरूड शाखा | ७५.१५ | २९.५८ | ०.१६ |
| ०७ | मार्केट यार्ड शाखा (धनकवडी) | ६५.७९ | ५२.६० | ०.४८ |
| ०८ | निरा शाखा | ६०.६३ | २३.६२ | ०.२० |
| ०९ | फलटण शाखा | ३०.०६ | ३४.५० | ०.४५ |
| १० | करमाळा शाखा | ३७.९५ | १४.९१ | ०.१६ |
| ११ | बार्शी शाखा | ४९.०५ | ५१.५१ | ०.३१ |
| १२ | पुणे – नगर रोड शाखा | ४१.५७ | ४७.५७ | ०.५६ |
| १३ | लक्ष्मी रोड शाखा (सदाशिव पेठ) | २७.५४ | २६.५० | ०.३७ |
| १४ | हडपसर शाखा | २४.२६ | ४४.०२ | ०.५३ |
| १५ | सातारा शाखा | ५६.१४ | ४९.३३ | ०.५१ |
| १६ | सोलापूर शाखा | ३१.६२ | १९.३५ | ०.२० |
| १७ | जळोची शाखा | ६९.८४ | ७९.५६ | ०.१५ |
| १८ | संगमनेर शाखा | ५२.०७ | ५.९४ | ०.०४ |
| १९ | चाकण शाखा | २२.३८ | १२.४२ | ०.०३ |
| २० | अहमदनगर शाखा | २१.३६ | ४.२९ | ०.०४ |
| २१ | शिरूर शाखा | २९.०४ | २२.५२ | ०.१० |
| २२ | नवी सांगवी शाखा | १५.२२ | ८.६५ | ०.०३ |
| २३ | भोसरी शाखा | १७.८९ | १४.११ | ०.०५ |
| २४ | सिंहगड रोड शाखा | ४.५४ | २.०१ | –०.०१ |
| २५ | शिरवळ शाखा | ५.५८ | २.५९ | –०.०२ |
| २६ | काष्टी शाखा | ७.५२ | ६.२४ | ०.०४ |
| २७ | तळेगांव शाखा | ४.२२ | २.६६ | –०.०२ |
| २८ | हिंजवडी शाखा | ४.४६ | ६.१३ | ०.०९ |
| २९ | टेंभुर्णी शाखा | २.६१ | ३.६१ | ०.०१ |
| ३० | सिन्नर शाखा | ६.६१ | ०.०५ | –०.०२ |
| ३१ | श्रीरामपूर शाखा | ०.४२ | ० | –०.०१ |
| ३२ | मोहोळ शाखा | ०.५५ | ०.०० | –०.०१ |
| ३३ | पनवेल शाखा | १.४९ | ०.०० | –०.०१ |
| ३४ | माळेगांव बु.।। शाखा | ०.५० | ०.०० | –०.०१ |
| ३५ | कोंढवा शाखा | ०.५० | ०.०० | –०.०१ |
| ३६ | वाई शाखा | ०.५५ | ०.०० | –०.०१ |
| ३७ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष.) | १.३८ | ०.१० | –०.०१ |
| ३८ | मुख्यालय | ०.०० | ०.०० | +१.९४ |
| | **एकूण** | **१३३०.२१** | **९४१.०६** | **९.५३** |



## सन २०१६-१७ चा
## ५६ वा अहवाल

**श्रीकांत सिकची (अध्यक्ष)**

बँकेच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी मी आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने मनापासून हार्दीक स्वागत करतो. दिनांक ३१ मार्चला संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने केलेल्या उत्तम प्रगतीसाठी बँकेचे सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक व कर्मचारी या सर्व घटकांचे मोलाचे सहकार्य मिळाले त्याबद्दल संचालक मंडळाचे वतीने आपणा सर्वांचे आभार मानतो.

दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. आर्थिक वर्षाच्या पुर्वार्धात चांगला पाऊस झाला व त्यामुळे शेती उत्पादन व बाजारात अनुकुल आर्थिक परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे ठेवींमध्ये व कर्जामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होईल असे सर्व बँकींग क्षेत्रास अपेक्षित होते. मात्र दि. ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी ₹ ५०० व ₹ १००० च्या नोटा चलनातून बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यामुळे संपुर्ण देशाची आर्थिक व्यवस्था बदलून गेली व निश्चलनीकरणामुळे सर्वांनाच विविध कठीण प्रसंगास सामोरे जावे लागले. बँकींग व्यवस्थेवर त्याचा मोठा ताण आला होता. मात्र आपल्या बँकेने पहिल्या दिवसापासूनच योग्य नियोजन केल्यामुळे सभासद, ग्राहक, व्यापारी यांना या काळात उत्तम सेवा दिली. पहिल्या दिवसापासूनच आपण जेष्ठ नागरीक, महिला, बँकेचे इतर ग्राहक व नोटा बदलून घेण्यासाठी येणारे ग्राहक यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करून त्यांची उत्तम सोय केली होती व ग्राहक सेवेचे उत्तम उदाहरण घालून दिलेले होते.

चलनातून बंद केलेल्या नोटांच्या बदल्यात नवीन चलन मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत होती. बाद झालेल्या नोटांचा भरणा करणे अतिशय अवघड होते परंतू त्याही परिस्थितीत आपल्या ग्राहकांना आपण चलन पुरवठा मिळण्याची व्यवस्था केलेली होती. समाजाच्या सर्व घटकांकडून आपल्या ग्राहक सेवेचे कौतुक झाले आहे. या काळात ग्राहक व सभासदांनी दिलेल्या सहकार्यामुळे या कठीण प्रसंगातून आपण मार्ग काढू शकलो.

निश्चलनीकरणा नंतर नवीन चलनाचा पुरवठा कमी झाला आहे. त्यामुळे त्याचा परिणाम ठेवींवर झालेला आहे. दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी ठेवी ₹१२२१.६२ कोटी होत्या. त्यामध्ये ₹१०८.५९ कोटींची वाढ होऊन वर्षअखेर ठेवी ₹१३३०.२१ कोटी इतक्या झालेल्या आहेत. कर्ज वाटपामध्ये संचालक मंडळाने पहिल्या पासूनच योग्य धोरण आखल्यामुळे व छोटे व्यापारी, सोने तारण, वाहन कर्ज, फेरीवाले इत्यादी घटकांना आकर्षित केल्याने कर्जवाटपात वाढ झालेली आहे. दि. ३१ मार्च २०१६ रोजी एकुण कर्जवाटप ₹७९२.०८ कोटी इतके होते. त्यामध्ये ₹१४८.९८ कोटी वाढ होऊन वर्षअखेर एकुण कर्जवाटप ₹९४१.०६ कोटी इतके झालेले आहे.

मागील वर्षी बँकेस निव्वळ नफा ₹ ८.१९ कोटी इतका झालेला होता. अहवाल सालात बँकेच्या कर्जवाटपात वाढ झाल्यामुळे उत्पन्नात वाढ झाली. त्यामुळे बँकेचा ढोबळ नफा ₹ २०.७३ कोटी इतका झालेला आहे. आयकर व इतर कायदेशीर तरतुदी वजा करता बँकेचा निव्वळ नफा ₹ ९.५३ कोटी झालेला आहे.

अहवाल सालात बँकेच्या तळेगांव, हिंजवडी, पनवेल, श्रीरामपूर, सिन्नर, माळेगांव बु.||, मोहोळ, टेंभुर्णी, वाई व कोंढवा या शाखा सुरू करण्यात आलेल्या असून शाखांची एकूण संख्या ३६ झालेली आहे. तसेच बँकेच्या सातारा व फलटण या शाखा स्वमालकीच्या झालेल्या आहेत.

अहवाल सालात बँकेस रिझर्व बँकेकडून स्वतःचा IFSC कोड मिळालेला आहे व बँकेची स्वतःची RTGS प्रणाली सुरू झालेली आहे. तसेच CCIL (क्लिअरींग कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड) यांचे सदस्यत्व मिळणेसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आलेला होता. त्याची तपासणी होऊन बँकेस सदस्यत्व मिळालेले आहे. ग्राहकांना कॅशलेस व्यवहार करायची सवय लागावी म्हणून POS मशीन उपलब्ध करून दिलेले आहेत. तसेच मोबाईल बँकींग व एटीएम व्दारे व्यवहार करणेसाठी ग्राहकांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. याबरोबरच पॅनकार्ड, गॅस सबसिडी, अपघात विमा, जिवन विमा, ई-टॅक्स भरणा या ही सुविधा ग्राहकांना देत आहोत. व्यापारी बँकाप्रमाणे सर्व सेवा सुविधा आधुनिक तंत्रज्ञानासह उपलब्ध केल्या आहेत.

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेच्या ठेवींचे उद्दिष्ठ ₹ १४७५ कोटी ठेवलेले असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे उद्दिष्ठ निश्चित प्राप्त होईल यात शंका नाही. तसेच आगामी काळात आणखी काही शाखा स्वमालकीचे जागेत स्थलांतर करणे , बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र करणे, नवीन शाखांचा पाया मजबुत करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. त्याचप्रमाणे ग्राहकांना बँकींग कामकाजास जादा वेळ लागू नये म्हणून फास्ट ट्रॅक टेलर सिस्टीम बँकेने चालू केलेली असून माळेगांव शाखेत प्रायोगिक तत्वावर मा. आ. श्री. अजितदादा पवार यांचे हस्ते त्याचे उद्घाटन केलेले आहे. ही प्रणाली सर्व शाखांत सुरू करणार आहोत.

अहवाल सालात मा. खा श्री. शरदचंद्रजी पवारसो, मा. आ. श्री. अजितदादा पवारसो माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.खा.सौ. सुप्रियाताई सुळे, मा.सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क यांनी व आपण सर्वांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य यामुळेच बँकेचा विकास व प्रगती होत आहे. तसेच बँकेचे उपाध्यक्ष, संचालक मंडळातील सर्व आजी व माजी सदस्य, मुख्यालयातील अधिकारी, शाखांचे शाखाधिकारी, सर्व सेवकवर्ग व सभासद बंधु भगिनी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले याबद्दल मी सर्वांचे मनापासुन आभार व्यक्त करतो.

आपल्या सर्वांच्या संमतीने आपणास अहवाल सादर करीत असून त्यास आपण मंजुरी प्रदान करावी ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,  
श्रीकांत सिकची  
(अध्यक्ष)

# ❋ सन २०१६-१७ चा ५६ वा अहवाल ❋

## सभासद

दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी बँकेचे एकुण सभासद १४६४२ होते. अहवाल सालात ६५२ सभासदांची वाढ झाली व १५३ सभासद कमी झालेले आहेत. अहवाल वर्षअखेर एकुण सभासद संख्या १५१४१ इतकी झाली आहे.

## भागभांडवल

बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण वाढण्यासाठी भाग भांडवलात वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. गेली दोन वर्षे कर्जवाटपात वाढ होत असल्याने भाग भांडवलातही मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. दि. ३१ मार्च २०१६ ला वसुल भागभांडवल ₹ २३.८६ कोटी इतके होते. अहवाल सालात भाग भांडवलामध्ये ₹ २.५३ कोटीची वाढ होऊन अहवाल सालामध्ये एकुण भाग भांडवल ₹ २६.३९ कोटी इतके झाले आहे. भागभांडवल वाढीचे प्रमाण शे. १०.६०% इतके आहे.

## स्वनिधी

दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर बँकेचा एकूण स्वनिधी ₹ ६५.४१ कोटी इतका होता. अहवाल सालात निधीमध्ये ₹ ३०.४० कोटीची वाढ होऊन वर्षाअखेर एकूण निधी ₹ ९५.८१ कोटी इतका झालेला आहे. निधीमधील ही वाढ बँकेने शाखेसाठी स्वमालकीच्या जागा खरेदी केल्या आहेत. त्या जागेचे पुर्नमुल्यांकन केल्याने ह्या निधीमध्ये मोठी वाढ दिसत आहे. निधी मधील वाढ झाल्याने बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाणही वाढले आहे.

## भांडवल पर्याप्तता (CRAR)
## (Capital to Risk Weighted Assets Ratio)

भारतीय रिझर्व बँकेने नियमानुसार आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण शे. ९% इतके असणे बंधनकारक आहे.

आपल्या बँकेच्या भागभांडवलात व राखीव निधीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्याचप्रमाणे बँकेच्या काही शाखा स्वमालकीच्या जागेत असल्याने त्यांचे बाजारमुल्य वाढलेले असल्याने पुर्नमुल्यांकन निधी (Revaluation Reserve) वाढत आहे. त्याचाच उपयोग भांडवल पर्याप्तता प्रमाण वाढण्यास झाला आहे. दि. ३१ मार्च २०१७ अखेर आपले भांडवल पर्याप्तता प्रमाण शे. १३.४०% इतके आहे.

## ठेवी

दि. ३१ मार्च २०१६ अखेर ठेवी ₹ १२२१.६२ कोटी इतक्या होत्या. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹ १०८.५९ कोटी रूपयांनी वाढ होऊन ठेवी ₹ १३३०.२१ कोटी इतक्या झालेल्या आहेत. मागील वर्षीपेक्षा ठेवींमधील वाढ कमी दिसत आहे. त्याचे कारण केंद्र सरकारने दि. ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी ₹ ५०० व ₹ १००० च्या नोटबंदीचा निर्णय घेतला. त्यानंतर या नोटबंदीच्या काळात व नोटबंदी नंतर नविन चलनाचा मोठा तुटवडा जाणवत होता. त्यामुळे बँकेमध्ये ठेवींचे प्रमाण कमी झाले होते. तरीसुध्दा बँकेने या काळात सेव्हींग्ज, चालु खाती उघडण्यावर भर देवून ठेवींमध्ये सातत्यपुर्ण वाढ होत राहील याची काळजी घेतली. तसेच नविन सुरू झालेल्या शाखांमुळेही ठेव वाढीमध्ये चांगली वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

बँकेने ठेवींच्या विम्याचा सहामाही हप्ता डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन (DICGC) कडे मुदतपुर्व भरलेला आहे. बँकेने चालु खाते व बचत खात्यांची संख्या वाढवून CASA डिपॉझीट वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यामुळे बँकेस कमी व्याजदराच्या ठेवी मिळण्यास मदत होत आहे.

ठेवींमधील ही वाढ सभासद ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास वृध्दींगत होत असल्याचे दिसून येत आहे. पुढील वर्षी ठेवींचे उद्दिष्ट ₹ १४७५ कोटींचे ठेवलेले आहे. आपण सर्व हे उद्दिष्ट गाठण्यास निश्चित सहकार्य करणार आहात याबद्दत तिळमात्र शंका नाही.

## कर्जे

मागील वर्षी एकुण कर्जवाटप ₹ ७९२.०८ कोटी एवढे होते. अहवाल सालात कर्ज वाटपात ₹ १४८.९८ कोटींनी वाढ होऊन अहवाल वर्षअखेर एकुण कर्ज वाटप ₹ ९४१.०६ कोटी इतके झाले आहे. बँकेच्या कर्जामध्ये किरकोळ कर्जाच्या वाढीसाठी सोनेतारण, वाहन कर्ज इत्यादी कर्जवाटपावर बँकेने भर दिलेला आहे.

## अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा

बँकेचे कर्जवाटप समाजातील सर्व दुर्बल घटकांना व अग्रक्रम क्षेत्रात होईल याकडे बँकेचे लक्ष असते. बँकेच्या एकूण कर्जवाटपापैकी अग्रक्रम क्षेत्रात शे. ६१.९६ टक्के इतके कर्जवाटप आहे तर दुर्बल घटकांना शे. २६.८९ टक्के इतके कर्जवाटप झाले आहे.

## एन.पी.ए.

गतसाली बँकेच्या एन.पी.ए. चे प्रमाण शे. ०.७७% इतके होते.

# ✻ सन २०१६-१७ चा ५६ वा अहवाल ✻

बँकेने हे उद्दिष्ट 0% पर्यंत कमी करण्याचे धोरण आखले होते. पहिल्या सहामाहीत त्याप्रमाणे वसुलीही झालेली होती. परंतु नोटाबंदीच्या निर्णयामुळे नोव्हेंबर ते डिसेंबर २०१६ या काळात वसुली होऊ शकली नाही. तसेच पुढे नोटाबंदीचा परिणाम व्यापार उद्योग यांवर होऊन मंदीचे सावट निर्माण झाले आहे. त्यामुळे वसुलीमध्ये घट झालेने एन.पी.ए. चे प्रमाण शे. ०.९५% इतके झाले आहे. तरी एन.पी.ए. चे प्रमाण कमी राहील याकडे संचालक मंडळाचे बारकाईने लक्ष राहील. थकबाकी कर्जदारांनीही आपले हप्ते वेळेवर भरून कटू कारवाई टाळावी अशी विनंती आहे.

## आय.टी.विभाग

### डेबीट कार्ड/ए.टी.एम. (Debit Card/ATM Card)

अहवालवर्षी आपल्या बँकेच्या डेबीट कार्डव्दारे होणाऱ्या व्यवहारांची संख्या वाढत आहे. दि. ३१ मार्च २०१७ अखेर २९६०० ए.टी.एम. कार्डचे वितरण झालेले आहे.

आपल्या बँकेची ए.टी.एम. सर्व भारतातील ए.टी.एम.शी संलग्न असल्याने बँकेच्या ग्राहकांना आपल्या बँकेच्या ए.टी.एम. शिवाय अन्य बँकेच्या ए.टी.एम. मधून व्यवहार करता येतात. तसेच अन्य बँकेच्या ग्राहकांना आपल्या ए.टी.एम. मधून रक्कम काढता येत आहे. तसेच कॅशलेस व्यवहार करणाऱ्या महाराष्ट्रामधील सहकारी बँकेच्या ग्राहकामध्ये आपल्या बँकेचा पहिल्या पाच बँकामध्ये समावेश झाल्याचे एन.पी.सी.आय ने कळविले आहे

### एस.एम.एस. बँकींग (SMS Banking)

आजपर्यंत एस.एम.एस. बँकींग सुविधेचा लाभ २६९०० खातेदारांनी घेतलेला आहे. एस.एम.एस. बँकींग सुविधेचा लाभ घेण्यासाठी आपला मोबाईल क्रमांक आपल्या खात्याशी नोंदणी करून घ्यावा व जास्तीत जास्त ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### आर.टी.जी.एस. व नेफ्ट (RTGS/NEFT)

आपल्या बँकेच्या ग्राहकांना आतापर्यंत आपण आर.टी.जी.एस. व नेफ्ट सुविधा एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत देत होतो. परंतु अहवाल सालात भारतीय रिझर्व बँकेकडे प्रस्ताव पाठवून आपल्या बँकेला स्वतंत्र आर.टी.जी.एस. कोड आपण प्राप्त केलेला आहे. त्यामुळे ग्राहकांना त्वरित ही सेवा उपलब्ध झाली आहे.

### CCIL (RBI) ची मेंबरशीप

बँकेस CCIL (RBI) ची मेंबरशीप मिळाली असून त्यामुळे बँकेस सरकारी रोखे ऑनलाईन खरेदी विक्री करणे शक्य होणार आहे.

### विमा व्यवसाय (Insurance)

आपल्या बँकेने व्यापारी बँकांसारखी सर्व सेवा ग्राहकांना देण्यासाठी सर्व प्रयत्न केलेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बँकेने ICICI Lombard व जनरल इन्शुरन्सची कार्पोरेट एजन्सी घेतली आहे. तसेच आयुर्विमासाठी एक्साईड लाईफ इन्शुरन्सची कार्पोरेट एजन्सी घेतली आहे. दि. ३१ मार्च २०१७ अखेर याच्या सहकार्यातून बँकेने ₹ ५९.०५ लाख इतके अतिरिक्त उत्पन्न मिळविलेले आहे.

तसेच सर्व ग्राहकांना प्रधानमंत्री जिवन विमा व सुरक्षा विमा व प्रधानमंत्री अपघात विम्याचे हप्ते भरण्याची सुविधा दिलेली आहे. आतापर्यंत या योजनेतून ४ वारसांना ₹ ८.०० लाख इतकी विम्याच्या दाव्याची रक्कम मिळालेली आहे. विम्याचा हप्ता कमी असल्याने जास्तीत जास्त ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

### अन्य सुविधा (Other Facilities)

१) पॅन कार्ड सुविधा

२) विज बिल भरणा सुविधा

३) ऑनलाईन टॅक्स भरणा सुविधा

### सेवकवर्ग

अहवाल सालात ठेवी, कर्जे वाढीमध्ये नोटाबंदीच्या काळातही सेवकांनी चांगली कामगिरी केलेली आहे. विशेषतः १० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर या नोटाबंदीच्या काळात सकाळी ९ ते रात्री १२ वाजेपर्यंत बँकेमध्ये कामकाज केलेले आहे. ग्राहकांच्या जुन्या नोटांचा भरणा करणेस परीपुर्ण सहकार्य केलेले आहे. बँकेने सुरवातीपासूनच नोटा बदलणे, भरणा करणे, वृध्द ग्राहक व महिला यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करून कामकाज सुरळीत ठेवले होते. त्यामुळे आपल्या बँकेच्या ग्राहकांना नोटा बदलणे व भरणा करणेबाबत कोणतीही अडचण आलेली नाही. या बद्दल सर्वच सेवकांचे मनापासुन आभार. तसेच RTGS, NEFT, ई-टॅक्स, मोबाईल बँकींग, एसएमएस बँकींग या सर्व सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यास सेवकांचे मोठे योगदान आहे. त्यामुळेच बँक नेहमीच प्रगतीपथावर आहे. बँकेचे कार्यकारी संचालक, सरव्यवस्थापक, शाखाधिकारी, वसुली अधिकारी व सर्वच सेवक अभिनंदनास पात्र आहेत.

**लाभांष**

सभासदांना त्यांचे भागावर शे. १२% लाभांष वितरीत करण्याची मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण ती मान्य करावी ही विनंती.

**मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे**

मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक निकषानुसार कर्ज वितरीत केलेले नाही. अहवाल सालात संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे कोणतेही कर्ज नाही.

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | कर्ज प्रकार | वर्षाअखेरीस बाकी (₹) | थकबाकी (₹) |
|---|---|---|---|---|
| १ | संचालक | मुदतीचे कर्ज | 0.00 | 0.00 |
| २ | नातेवाईक | मुदतीचे कर्ज | 0.00 | 0.00 |
| | **एकूण** | **–** | **0.00** | **0.00** |

**नफा वाटणी**

दि. ३१ मार्च २०१७ अखेर बँकेस ₹ ९५२७२५७८.७० इतका नफा झालेला आहे. मागील वर्षीचा शिल्लक नफा ₹ ३०११४.४९ जमेस धरता एकुण नफा ₹ ९५३०२६९३.१९ नफा वाटणीस उपलब्ध आहे. सदर नफ्याची वाटणी पुढील प्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १ | गंगाजळी (रिझर्व फंड) | ३,१५,००,०००.०० |
| २ | लाभांष | ३,१०,००,०००.०० |
| ३ | इमारत निधी | २,२५,००,०००.०० |
| ४ | शाखाविस्तार निधी | १०,००,०००.०० |
| ५ | गुंतवणुक अवमुल्यन निधी | ७५,००,०००.०० |
| ६ | लाभांष समिकरण निधी | ५,००,०००.०० |
| ७ | धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| ८ | आकस्मित निधी | २,००,०००.०० |
| ९ | सभासद शिक्षण निधी | ७,००,०००.०० |
| १० | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ११ | शिल्लक नफा | २६९३.१९ |
| | **एकूण** | **९,५३,०२,६९३.१९** |

**लेखापरिक्षण**

सन २०१६–१७ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. अे. मल्लावत चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांनी पुर्ण केलेले आहे. त्यांचा लेखापरिक्षण अभिप्राय अहवालात प्रकाशित केला आहे. अहवाल सालात बँकेचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' कायम राहीलेला आहे.

### शाखाविस्तार

दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर मुख्यालयासहीत एकुण शाखा २७ व १ विस्तारित कक्ष अशी २८ कार्यालये ग्राहकांना सेवा देत होती. अहवाल सालात बँकेने तळेगांव, हिंजवडी, पनवेल, श्रीरामपूर, सिन्नर, माळेगांव, मोहोळ, टेंभुर्णी, वाई व कोंढवा या ठिकाणी नवीन शाखा सुरू केल्या त्यामुळे शाखांची संख्या ३६ इतकी झालेली आहे. त्यापैकी कोंढवा व वाई शाखांचे कामकाज सुरू केलेले आहे मात्र उद्‌घाटन समारंभ अद्याप झालेला नाही. शाखांच्या ठिकाणी ग्राहकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून ठेवींचे प्रमाण वाढण्यास मदत होत आहे.

तसेच सातारा व फलटण या शाखांचे स्वमालकीचे वास्तुत स्थलांतर झालेले आहे.

### नोटाबंदी (डिमॉनिटायझेशन ऑफ नोटस् ₹ ५०० व ₹ १०००)

केंद्र सरकारने दि. ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी चलनातील ₹ ५०० व ₹ १००० च्या नोटा बंद करण्याचा निर्णय घेतला व दि. ०९ नोव्हेंबर २०१६ रोजी शिल्लक नोटांचा तपशिल RBI ला देण्यात आला व देशाच्या दि. १० नोव्हेंबर २०१६ पासुन वरील नोटा बँकेमधून बदलून व भरणा करून घेण्याच्या सुचना दिल्या. या काळात रोज जमा झालेल्या नोटांचा तपशिल RBI कडे पाठविला जात होता. व आपल्या बँकेने ग्राहकांना या काळात जास्तीत जास्त सेवा देऊन त्यांच्या नोटांचा भरणा वेळेत करून घेण्याची सुविधा दिली होती.

बँकेने प्रथमपासुनच या नोटाबंदीच्या काळात केंद्र सरकार व रिझर्व बँकेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केलेले होते. त्यामुळे बँकेच्या भरणा करण्यासाठी जात असलेल्या वाहनाची इनकम टॅक्स डिपार्टमेंट, सी.बी.आय व सहकार खात्याकडुन तपासणी झाली व सर्व व्यवहार कायदेशीर असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे बँकेची बारामती ग्रामीण पोलीसांनी जप्त केलेली रोकड २४ तासात परत बँकेस मिळाली. यावेळी सर्व सभासद ग्राहक, ठेवीदार यांनी प्रचंड विश्वास बँकेच्या कामकाजावर दाखविला त्याबद्दल बँक आपली आभारी आहे.

### ॲन्टी मनी लॉन्डरींग सेल

रिझर्व बँक ऑफ इंडियाने ॲन्टी मनी लॉन्डरींग व कॉम्बॅटींग फायनान्स टेररिस्ट ॲक्टीव्हिटीज बाबत अनेक सुचना बँकेस केलेल्या आहे.

त्याची कडक अंमलबजावणी बँकेकडून केली जाते. त्यांचे सुचनेनुसार रोखींचा व्यवहार, संशयीत व्यवहार, खोटया नोटांचा अहवाल, नफा न मिळविणाऱ्या संस्थांचा अहवाल तयार केले जात आहेत व हे अहवाल फायनान्शीयल इंटेलिजन्स युनिट - इंडिया दिल्ली (FIU-IND) यांचेकडे वेळेवर सादर केले जात आहेत.

### पुरस्कार

बँकेच्या प्रगतीची दखल वेळोवेळी विविध संस्थांकडून घेतली जात असून सन २०१५-१६ सालासाठी बँकेस NPA व्यवस्थापनासाठी पुणे जिल्हा नागरी सह. बँक्स असो. पुणे यांचा तर नचिकेत 'सहकार श्रेष्ठ' नागपुर यांचा संपूर्ण महाराष्ट्रामधून राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार बँकेस मिळाला आहे.

### आभार

बँकेच्या दैनंदिन विकास व प्रगतीसाठी वेळोवेळी ज्या व्यक्तिंचे, संस्थांचे सहकार्य मिळाले त्यांचे ऋणनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये आपले आदरणीय लोकनेते मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, बारामती, मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. रामराजे नाईक निंबाळकर सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य, मा. खा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील, मा. श्री. राजेंद्र पवार, अध्यक्ष, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मा. श्री. रणजित पवार, अध्यक्ष, बारामती सहकारी औद्योगिक वसाहत, यांचे बँकेच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. रमेशआप्पा थोरात व उपाध्यक्षा सौ.अर्चना घारे, इंदापुरचे आमदार मा. श्री. दत्तात्रय भरणे, मा. श्री. दशरथ माने माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद पुणे, मा. श्री. पुरूषोत्तम (दादा) जगताप अध्यक्ष सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, मा. श्री. अमरसिंह घोलप अध्यक्ष श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, मा.श्री. रंजनकुमार तावरे अध्यक्ष, दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, मा. श्री. बाळासाहेब तावरे माजी अध्यक्ष दि माळेगांव सहकारी साखर कारखाना तसेच बारामती नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पौर्णिमा तावरे तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री श्री सदाशिव (बापू) सातव, श्री जवाहरशेठ वाघोलीकर, श्री इम्तियाज शिकीलकर, मा. सौ. जयश्रीताई सातव तसेच अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. शांतीशेठ सराफ इत्यादींनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

बारामती, इंदापूर, दौंड, करमाळा, बार्शी, सातारा, संगमनेर व इतर सर्व शाखा क्षेत्रातील नगर परिषदांचे अध्यक्ष, पुणे, पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर व बारामती तालुका दूध उत्पादक संघ, बारामती तालुका खरेदी विक्री संघ, बारामती तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद पुणे, श्री. काशिविश्वेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्या., बिल्डर्स असोसिएशन बारामती, बारामती स्विमर्स क्लब, व्यापारी महासंघ बारामती, बारामती मर्चंटस् असोसिएशन, तसेच बँकेच्या शाखांच्या कार्यक्षेत्रातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था

सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी बँकेच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बँकेस सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

